**ठळक बातम्या**

- भारतीय स्वातंत्र्यलढ्यातले हुतात्मा क्रांतिकारक भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना देशाची आदरांजली
- महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर करण्यासाठीचा रोडमॅप तयार असून हे उद्दिष्ट २०२९ मधेच साध्य होईल, असा मुख्यमंत्र्यांना विश्वास
- नागपूरमधे हिंसाचारानंतर लागू केलेली संचारबंदी पूर्णपणे उठवली, मात्र पोलीस बंदोबस्त कायम
- खेलो इंडिया पॅरागेम्स नेमबाजी स्पर्धेत महाराष्ट्राच्या सागर कातळे याला १० मीटर एअर रायफल प्रोन मिक्स्ड एसएच वन प्रकारात सुवर्णपदक

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत हैदराबाद इथं झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा राजस्थान रॉयल्सवर ४४ धावांनी विजय

**<><><><><>**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातले तीन वीर क्रांतिकारक भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना संपूर्ण देश आज श्रद्धांजली वाहत आहे. १९३१ मध्ये आजच्याच दिवशी लाहोरच्या मध्यवर्ती तुरुंगात या तीन वीरांना फाशी देण्यात आली होती. या दिवसाचं शहीद दिन म्हणून स्मरण करण्यात येतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या तिन्ही वीरांना श्रद्धांजली वाहिली आहे. समाजमाध्यमावर मोदी यांनी भगत सिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या बलिदानाचं स्मरण केलं आहे. स्वातंत्र्य आणि न्यायासाठी या क्रांतीकारकांनी

दाखवलेलं दुर्दम्य साहस आणि सर्वोच्च बलिदान देशवासियांना प्रेरित करेल, असं त्यांनी म्हटलंय. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज मुंबईत राजभवन इथं भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या प्रतिमांना पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी शहीद दिनानिमित्त आज सकाळी नाशिकच्या शासकीय विश्रामगृहात भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

<><><><>

राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर करण्यासाठीचा रोडमॅप तयार असून हे उद्दिष्ट २०२९ मधेच साध्य होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त  केला. सीआयआय यंग इंडियन्सच्या पश्चिम क्षेत्र परिषदेच्या तीन दिवसीय बैठकीचा समारोप आज नाशिकमधे झाला, यात मुख्यमंत्र्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. आर्थिक विकासासाठी पायाभूत सुविधा महत्वाच्या आहेत, त्या दृष्टीनं समृद्धी महामार्ग तयार झाला असून शक्तिपीठ महामार्गही तयार केला जात असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. देशात सर्वाधिक परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे, राज्यात शाश्वत विकासाला प्राधान्य दिलं जात आहे असं फडनवीस म्हणाले.

<><><><>

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर इथं कुंभमेळ्याची पूर्वतयारी वेगानं करण्यासाठी कुंभमेळा प्राधिकरण स्थापन केलं जात असून प्रयागराजच्या धर्तीवर लवकरच कायदा केला जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. त्यांनी आज नाशिकमध्ये कुंभमेळा तयारीचा आढावा घेतला. त्यानंतर ते वार्ताहर परिषदेत बोलत होते. त्र्यंबकेश्वर विकास आराखड्याला मान्यता

दिली आहे. नाशिकमध्ये गोदावरी नदीच्या शुध्दीकरणासाठी खासगीकरणातून कामं केली जाणार असून पुढच्या महिन्यात या कामाला सुरूवात होईल, असं फडनवीस यांनी सांगितलं.

<><><><><>

नागपूरमधे गेल्या आठवड्यात झालेल्या हिंसाचारानंतर लागू केलेली संचारबंदी आता पूर्णपणे उठवली आहे. नागपूरचे पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल यांनी आज दुपारी ३ वाजल्यापासून संचारबंदी पूर्णपणे उठवण्याचे आदेश जारी केले.

गेल्या सोमवारी झालेल्या हिंसक प्रकारानंतर ११ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू केली होती. त्यापैकी काही भागातली संचारबंदी २० मार्चला, तर आणखी काही भागातली संचारबंदी काल उठवली. उर्वरित भागातली संचारबंदीही आज दुपारी ३ वाजल्यापासून उठवण्याचे आदेश पोलिस आयुक्त रवींद्र सिंघल यांनी दिले. संवेदनशील भागात स्थानिक पोलिसांची गस्त सुरु राहील. तसंच बंदोबस्तही कमी होणार नाही असं सिंघल यांनी सांगितलं.

<><><><><>

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरी बेहिशोबी रोख रक्कम सापडल्याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाच्या अंतर्गत चौकशीचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर काल रात्री उशिरा प्रसिद्ध झाला. या अहवालात छायाचित्रं आणि चित्रफितींचाही समावेश आहे. या प्रकरणी न्यायमूर्ती वर्मा यांचं स्पष्टीकरण सर्वोच्च न्यायालयानं प्रसिद्ध केलं. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी वर्मा

यांच्यावरच्या आरोपांच्या चौकशीसाठी तीन सदस्यांची अंतर्गत चौकशी समिती स्थापन केली असून न्यायमूर्ती वर्मा यांना कोणतंही न्यायालयीन काम देऊ नये, असे निर्देश दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना दिले आहेत.

**<><><><><>**

सामाजिक न्यायाचे खंदे समर्थक आणि महान स्वातंत्र्यसैनिक डॉक्टर राम मनोहर लोहिया यांची आज जयंती. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लोहिया यांनी श्रद्धांजली वाहिली आहे. लोहिया हे एक दूरदर्शी नेता होते. वंचितांना सबल करण्यासाठी आणि सक्षम भारताच्या निर्माणासाठी लोहिया यांनी आपलं जीवन समर्पित केलं, असं प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमावरील एका पोस्टमध्ये लिहिलं आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीत सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरागेम्सच्या नेमबाजी स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या सागर बाळासाहेब कातळे याने १० मीटर एअर रायफल प्रोन मिक्स्ड एसएच वन प्रकारात सुवर्णपदक मिळवलं आहे. मोना अग्रवाल हिने रौप्य तर दीपक सैनी याने कांस्यपदक जिंकलं आहे.

सुमेधा पाठक हिनं १० मीटर एअर पिस्तूल महिला एसएच वन प्रकारात सुवर्णपदक जिंकलं. रुबिना फ्रान्सिसनं रौप्यपदक तर अनिता कुमारीने कांस्यपदक जिंकलं.

पॅरा तिरंदाजी स्पर्धेचा आज समारोप झाला. पॅरालिम्पिक पदक विजेती शीतल देवीनं कंपाउंड महिला ओपन प्रकारात सुवर्ण पदक जिंकलं, तर पायल नागनं रौप्यपदक आणि ज्योतीनं कांस्यपदक जिंकलं.

**<><><><><>**

मियामी ओपन टेनिस स्पर्धेत भारताचा युकी भांबरी आणि त्याचा पोर्तुगीज जोडीदार नुनो बोर्ज यांनी पुरुष दुहेरीच्या उप उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. अमेरिकेत आज सकाळी झालेल्या सामन्यात भांबरी आणि बोर्ज यांनी रोहन बोपन्ना आणि इवान डोडीज यांचा ६-४, ३-६, १०-७ असा पराभव केला. भांबरी – बोर्ज जोडीचा सामना उद्या चेक प्रजासत्ताकच्या ऍडम पेवलासेक आणि ब्रिटनच्या जेमी मरे यांच्याशी होणार आहे.

**<><><><><>**

वेव्हज् यंग फिल्ममेकर स्पर्धेसाठी देशभरातून तेराशेपेक्षा जास्त स्पर्धकांनी नाव नोंदणी केली आहे. यातल्या वीस स्पर्धकांची अंतिम यादीत निवड झाली आहे. अमोल गुप्ते आणि चैतन्य चिंचलीकर यांचं मार्गदर्शन तसंच व्हिसलिंग वूड्स इंटरनॅशनलची मदत या स्पर्धकांना मिळाली. व्हिसलिंग वूड्स इंटरनॅशनलमधे मार्गदर्शन तसंच प्रशिक्षण दिलं जातं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबाद इथं झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादनं राजस्थान रॉयल्सला ४४ धावांनी पराभूत केलं. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. सनरायझर्स हैदराबादनं निर्धारित २० षटकात ६ गडी गमावून २८६ धावा केल्या. ईशान किशनच्या नाबाद १०६ धावांचा त्यात मोठा वाटा आहे. ट्रॅविस हेडनं ६७ धावांचं योगदान दिलं.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सला निर्धारित २० षटकात ६ गडी गमावून २४२ धावाच करता आल्या. ध्रुव जुरेलनं सर्वाधिक

७० धावा केल्या. तो बाद झाल्यावर शिम्रॉन हेटमायर आणि शिवम दुबे यांनी फटकेबाजी करत चिवट झुंज दिली. त्यांनी सहाव्या गड्यासाठी ८० धावांची भागिदारी केली. हेटमायरनं २३ चेंडूत ४६, तर सिवम दुबेनं ११ चेंडूत नाबाद ३४ धावा केल्या.

आजचा दुसरा सामना मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात चेन्नई इथं सुरू आहे. चेन्नई सुपर किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबई इंडियन्सच्या ८ षटकात ३  बाद ६६ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा विकास करण्यासाठी राज्य सरकारनं ५०० कोटी रुपयांचा निधी दोन टप्प्यात द्यावा अशी मागणी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. छत्रपती संभाजी नगर इथं पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या तंत्रनिकेतन महाविद्यालयात सेंटर ऑफ एक्सलंस लर्निंगचं उद्घाटन करताना ते बोलत होते.

पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा विस्तार करून वैद्यकीय महाविद्यालय, परिचर्या महाविद्यालय, वसतिगृह आदी उपक्रम, तसंच महाविद्यालयांच्या जुन्या इमारतींचं नूतनीकरण करण्यासाठी हा निधी दोन टप्प्यात द्यावा, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला यंदा शंभर वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त अनेक कार्यक्रमांचं आयोजन केल्याची माहिती संघाचे सरकार्यवाह  दत्तात्रय होसबाळे यांनी दिली आहे. बंगळुरू इथे आज झालेल्या संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधींच्या तीन दिवसीय राष्ट्रीय सभेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. या निमित्ताने औपचारिक उत्सव आयोजित केलेला नाही, यंदा विजयादशमीपासून विविध कार्यक्रम सुरू होतील, असंही ते म्हणाले. सामाजिक सौहार्द आणि राष्ट्रीय एकता वाढवण्यासाठी स्थानिक पातळीवर जनसंपर्क कार्यक्रम आयोजित केले जातील, असं त्यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**